दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे


बीड/महाराष्ट्र • बुधवार दि.१९ फेब्रुवारी २०२५ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-११५ • पाने ४ • किंमत ४ रुपये




# योजना राबवण्यात हयगय करणाऱ्यांची गय करू नका-केंद्रीय मंत्री गडकरी

## सरकारी योजना राबविण्यात हयगय करणारे अधिकारी, कंत्राटदारांची गय केली जाणार नाही

**नागपूर (वृत्तसंस्था): सरकारी योजना राबविण्यात हयगय करणारे अधिकारी, कंत्राटदारांची गय केली जाणार नाही. त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी, असे निर्देश केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांना दिले. जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची (दिशा) बैठक गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली सदर येथील नियोजन भवनच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. यावेळी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र सरकार पुरस्कृत योजनांचा आढावा गडकरींना घेतला.**



गडकरी यांनी स्वच्छ भारत अभियान, सक्षम अंगणवाडी व पोषण, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, अमृत १ व २, प्रधानमंत्री आवास योजना, पाणी व कचरा व्यवस्थापन योजना, प्रधानमंत्री स्वानिधी योजना, प्रधानमंत्री आदिवासी ग्राम विकास योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, आयुष्मान भारत आदी योजनांचा आढावा घेतला.प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये गरिबांना घरे द्या, पण त्याचवेळी अवैधरित्या घरांचा ताबा घेणाऱ्या लोकांवर पोलिसांच्या सुरक्षेत कारवाई करा, असे स्पष्ट निर्देश गडकरी यांनी दिले. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचाही चुकीचे लोक लाभ घेत असतील तर त्यांच्यावर कारवाई करा, असेही गडकरी म्हणाले.ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन योजनेचा आढावा देखील मंत्री महोदयांनी घेतला. गावातून गोळा होणारा कचरा रस्त्याच्या कामात वापरता येईल का किंवा त्यातून कंपोस्ट खत तयार करता येईल का, याचा विचार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. ग्रामीण भागात पाणीपुरवठा योजनेची १३७ कामे प्रगतीपथावर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. त्यावर योजनेची अंमलबजावणी करताना पाइपलाइन टाकण्यापूर्वी पाण्याचा स्रोत निश्चित करा, अशा सूचना मंत्री महोदयांनी दिल्या.नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या मागास वर्गात सिकलसेल, थॅलेसिमियाची मोठी समस्या आहे. या समाजातील पिढ्या वेदना सहन करत आहे. उत्तर नागपुरातील ८० टक्के लोक सिकलसेल, थॅलेसिमियाने ग्रस्त आहेत. या आजारांवर नागपुरात उपचार व्हावा यासाठी आपण एम्समध्ये यंत्रणा तयार करीत आहोत. पण आपण स्वतः लक्ष घालून लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, अशा सूचना ना. श्री. गडकरी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.रस्ते अपघातात जखमी झालेल्या रुग्णाला कुठल्याही रुग्णालयात उपचार घेण्यासाठी सरकार मदत करेल. ही योजना रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयातर्फे लागू करण्यात आली आहे. या योजनेचा प्रचार प्रसार करून नागपूर शहर व जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश गडकरी यांनी जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्तांना दिले.

# मानवी मूल्य संविधान मूल्या आधारे जीवन जगत साहित्य आविष्कार करावेत-चंद्रप्रकाश शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

चंद्रप्रकाश जी. शिंदे (अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.महा.राज्य)यांनी जीवन प्रणाली प्रतिष्ठान संचलीत मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र व्दारा संविधान अमृत वर्षानिमित्त विदर्भ विभागीय कविसंमेलनाच्या उद्धघाटन सत्राचा अध्यक्षीय समरोप करताना बोलताना ते म्हणाले कि साहित्यिकांनी मानवी मूल्य व संविधान मूल्य ही जीवन मूल्य जगुन साहित्य आविष्कार केले पाहिजेत.संविधान अमृत वर्षानिमित्त मानव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषद महाराष्ट्र व्दारा कविसंमेलनाच्या शृंखलेतील दुसरे विदर्भ विभागीय कविसंमेलनात उपस्थित साहित्यिक व साहित्य रसिकांनी संविधाना



प्रती दाद दिल्या बद्दल आभिनंदन प्रस्तावित करतान धी. डी.जी. वाळवंटे (अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.परभणी) यांनी केले.

उद्धघाटक धीमती सुशमा पाखरे प्रसिद्ध विचारवंत वर्धा यांनी आपले विचार मांडताना संविधानिक संरक्षणामुळे आम्हाला अधिकार प्राप्त झालेले आहेत. तेव्हा लोकशाही प्रणाली जीवन प्रणाली बनली पाहीजे.प्रमुख पाहूणे धी.माजिद बेग मुगल यांनी संविधान बाह्य कृति सामूहिक संघर्ष करावा आसल्याचे प्रतिपादन केले. प्रा.डॉ.गजानन सयाम यांनी शब्दाचे सामर्थ लक्षात घेउन त्याचा उपयोग साहित्यिकांनी संविधान व लोकशाही दृढ होण्यासाठी करावा. सुत्रसंचालन धी.सुनिल गायकवाड( सचिव. प्र.सृ.सा.प.महा.राज्य ) यांनी प्रभावीपणे केले. कविसंमेलनात जवळपास ३५ प्रतिभासंपन्न कविचा सहभाग झालेला होता त्यांनी बहारदार कविता सादर केल्या. कवि संमेलनाचे सुत्रसंचालन धी.देविलाल रौराळे(अध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प.आमरावती )व धी.आम्रपाली पारवे(सचिव मा.प्र.सृ.सा.प.वर्धा यांनी सुत्रसंचालन उत्कृष्ट पणे केले.कविसंमेलनाचे अध्यक्ष धी.योगीराज कोचाडे(सह सचिव मा.प्र.सृ.सा.प.मह) यांच्या काव्याने अध्यक्षीय समारोप झाला.शेवटी धी.रवि कोकुर्डे हिंगणघाट यानी आभार प्रदर्शन कार्यक्रमाज ची सांगता झाली.

# जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी जप्त

**बीड (प्रतिनिधी):** महाराष्ट्रात बीड जिल्ह्याची संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे सर्वत्र चर्चा सुरू आहेच, त्यात आता आणखी एका घटनेने सर्वांचे लक्ष वेधले आहे. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडीच जप्त करण्यात आली आहे. जिल्हाधिकारींची गाडी जप्त होण्याची बीडमधील ही पहिलीच घटना आहे. अविनाश पाठक असे जिल्हाधिकारींचे नाव आहे. बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ साली लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तीन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या. त्या शेतकऱ्यांना तुटपुंजा मोबदला दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना ३२ लाखांची भरपाई देण्याचे आदेश माजलगाव न्यायालयाने दिले. त्यानंतर शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही. तब्बल ९ वर्षांपासून शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत. यामुळे शेतकरी हताश झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर न्यायालयात धाव घेतली आणि शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल लागला.न्यायालयाने शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला देण्याचे अनेकवेळा आदेश दिले होते. तरी देखील कुठलीही कारवाई केली जात नव्हती. अखेर न्यायालयाने सर्व प्रकार समजून घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने आदेश देताच जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी म्हणजे वापरात असलेली गाडी जप्त करण्यात

# परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समिती कडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट


## भाजीपाला आडत दुकानदाराकडून शेकडा १०% शेतकऱ्यां कडून आडत घेत असलेली रक्कम बंद करावी-वैजनाथ गित्ते

**परळी । प्रतिनिधी**

परळीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. आधीच शेतीमालाला भाव नसल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडलेला असताना कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मात्र शेतकऱ्यांची मनमानी पद्धतीने लूट होत आहे. शेतकऱ्याकडून दहा टक्के आडत म्हणून रक्कम वसूल केली जात आहे. दरम्यान या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन ही पाठवण्यात आले आहे. शेतकऱ्यांची होणारे लूट तात्काळ थांबवावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे बीडचे जिल्हाधिकारी यांना नंदागौळ येथील शेतकरी वैजनाथ ज्ञानोबा गित्ते यांनी केली आहे.

याबाबत बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कृषी उत्पन्न बाजार समिती परळी-वै. हे शेतकऱ्यांकडून आपले स्वतःचा भाजीपाला विकण्यासाठी बसलेल्याकडून प्रत्येकी दररोज २० रुपये प्रमाणे वसुली करत आहेत. श्री. सदाभाऊ खोत हे पणन सहकार राज्यमंत्री असताना कोणत्याही शेतकऱ्याकडून शेतकऱ्याच्या कोणत्याही मालावर आडत वसुली किंवा इतर कर लावला जाणार नाही या संदर्भात जा.क्र. पणन-५/कृउबास/अडत/२०१४/४०७० दि.२० डिसेंबर २०१४ चा शासन निर्णय आहे. परंतु मार्केट कमेटीचे कर्मचारी गरीब शेतकऱ्यांकडून प्रत्येकी २० रुपये दररोज करीत असलेली वसूली ८ दिवसांमध्ये बंद नाही केल्यास मा. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करावे लागेल. जवळपास ३०० शेतकरी दररोज कृषी उत्पन्न बाजार समिती/नगर पालिकाच्या जागेत स्वतःचा भाजीपाला विकतात. त्याप्रमाणे प्रति शेतकऱ्यांकडून २० प्रमाणे दररोज ६००० रुपये वसुली केली जाते. त्याप्रमाणे महिन्याचे १,८०,०००/- रुपये तर वर्षाला २१ लाख ६० हजार रुपये शेतकऱ्यांकडून वसुल केले जातात. तसेच परळी येथील भाजीपाला आडत म्हणून शेतकऱ्यांकडून १० टक्के रक्कम कपात केली जाते. वास्तविक महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी ही आडत आकरल्या जात नाही. मात्र हे सर्व प्रकार फक्त बीड जिल्ह्यातच घडत आहेत. त्यामुळे येथील शेतकरी त्रस्त झाले आहेत. येथील भाजीपाला इतर ठिकाणी घेवून जाण्याची वेळ या शेतकऱ्यांवर येत आहे. तरी मा. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वै. जि.बीड याच्यावर शेतकऱ्याची फसवणुकीचा गुन्हा दाखल करून व संबंधित भाजीपाला आडत दुकानदार यांच्यावर सुद्धा शासन निर्णय डावलून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्या प्रकरणी त्यांच्यासुद्धा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत.अन्यथा परळी कृषी उत्पन्न बाजार समिती समोर आमरण उपोषण करावे लागेल याची गांभीर्याने दखल घ्यावी असेही जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात वैजनाथ गित्ते यांनी म्हटले आहे.

# श्री.गणेश विद्या मंदिर शाळेमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न



« पान २ वर

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालूक्यातील अंमळनेर (भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.गणेश विद्या मंदिर शाळेमध्ये एस.एस.सी परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ ला प्रविष्ट होणाऱ्या इ.१० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर.एम.हाके सर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, सेवकांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.प्रथम इ.१० वीच्या विद्यार्थिनींनी सुंदर स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले.नंतर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते शाळेच्या सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा गुलाब पुष्प व पेन देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी इ.१० वी तील कु.संस्कृती लटपटे,कु.साक्षी पोकळे,कु.साक्षी,कु.ज्ञानेश्वरी सारगुडे, कु.प्रतिक्षा आहेर,कु.सोनाली खेंगरे, कु.प्रगती पोकळे,कु.वैष्णवी कांबळे, पवन पुलावळे या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शाळेविषयी व शाळेतील विविध उपक्रमांविषयी तसेच शिक्षकांविषयी आपापली मनोगते व्यक्त केली.आपल्या मनोगतांमधून विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणी,विविध स्पर्धा, कार्यक्रम,शैक्षणिक सहल,क्षेत्र भेट, विविध स्पर्धा परीक्षा यांविषयी आढावा घेऊन सर्व शिक्षकांच्या विद्यार्थ्यांप्रती असणाऱ्या तळमळीविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.यानंतर शाळेचे जेष्ठ शिक्षक एफ.एस.जाधवर सर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व सांगून परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.नंतर शाळेचे मुख्याध्यापक हाके सरांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शुभेच्छा समारंभाच्या निमित्ताने इ.१० वीच्या विद्यार्थ्यांकडून विद्यालयाला ७५०० रू.किंमतीच्या ३० थोर महापुरूषांच्या सुंदर प्रतिमा सप्रेम भेट म्हणून देण्यात आल्या. विद्यालयाला दिलेल्या ह्या सप्रेम भेटीबद्दल शाळेचे जेष्ठ शिक्षक जाधवर सरांनी इ.१० च्या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

# धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथील पाहिल्या बौद्ध धम्म परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित रहा-इंजि प्रशांत उघडे

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका अध्यक्ष इंजि प्रशांत उघडे यांनी केले आहे.या धम्म परिषदेचे उद्घाटन दि. १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस सुरुवात होणार आहे. धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो, डॉ. भदंत इंदवंस महाथेरो, विपस्सनाचार्य भदन्त पय्यारत्न थेरो, भदन्त पय्याबोधी थेरो, भदन्त मुदितानंद थेरो, भदन्त ज्ञानरक्षित थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो, भदन्त पय्याशील थेरो, भिक्खू धम्माल थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू संघरत्न, भदन्त धम्मघोष यांची धम्मदेसना होणार आहे. या धम्म परिषदेस परिसरातील धम्म बांधवांनी व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका अध्यक्ष इंजि प्रशांत उघडे यांनी केले आहे.



« पान २ वर

संपादकीय

# नवसर्जनाचे अभिजात आमंत्रण

लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक तारा भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड स्वागतार्ह आहे. आता ही निवडणूक होत नाही. यंदाही अनेक नावे चर्चेत आली असतील. मात्र, वयाचे ज्येष्ठत्व आणि साहित्य-संस्कृती क्षेत्रातली अनेक दशकांची तपस्या पाहता तारा भवाळकर यांची निवड समाधानाची आहे. हे संमेलन दिल्लीत होते आहे, हे जसे महत्त्वाचे; तसेच, ते केंद्र सरकारने मराठी भाषेला ‘अभिजात’ असा दर्जा प्रदान केल्यानंतरचे पहिले संमेलन आहे, हेही मोलाचे आहे. संमेलनांची दिंडी आता ९८व्या मुक्कामावर आहे. दोन पावलांनी शताब्दी येईल. त्याचीही तयारी अनेकांच्या मनात सुरू असेल. मात्र, आताचे संमेलन आणि त्याच्या संयोजकांनी ही ‘अभिजात’ची महत्त्वाची घडामोड लक्षात घेऊन संमेलनातील कार्यक्रम, परिसंवाद, चर्चा आणि एकूण आयोजन यांचा रोख भविष्यवेधी ठेवायला हवा. मराठी भाषा ‘अभिजात’ झाल्यानंतर मुंबईत जो छोटेखानी कार्यक्रम झाला; त्यातली डॉ. सदानंद मोरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोघांचीही भाषणे अतिशय महत्त्वपूर्ण होती. एक मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र हे मराठी राज्य जन्माला आल्यानंतरचा तीन ऑक्टोबर, २०२४ हा सर्वांत महत्त्वाचा दिवस आहे, असे डॉ. मोरे म्हणाले. ते इतिहासापेक्षाही भविष्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. राज्य सरकार आता दरवर्षी तीन ऑक्टोबर हा ‘मराठी अभिजात भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करणार आहे. कोणतेही दिवस साजरे करण्याची सरकारची आजवरची रीत पाहता ‘मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया...’ असे होण्याची भीती असते.सरकारी खात्यांच्या डोक्यावरचे एक दोडके ओझे तेवढे अशा निर्णयांनी वाढते. पंतप्रधान मोदी यांनी मुंबईतल्या भाषणात मराठीच्या भविष्याचे जे रमणीय, प्रेरक चित्र रंगविले; ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण नुसते सोहळे करण्याच्या पलीकडे काय करू शकतो, याचा विचार राज्य सरकार आणि साहित्य संमेलने यांना आजवरचे कल्पकतेचे दारिद्र्य फेडून करावा लागणार आहे. तो जिद्दीने प्रत्यक्षात आणावा लागणार आहे. मोदी म्हणाले की, आता देशात सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्याची सुविधा मिळू शकेल. तेथे नवे संशोधन होऊ शकेल. पण हे आपोआप कसे होणार? तिथे त्यासाठी विद्यार्थी हवेत आणि शिक्षकही. बृहन्महाराष्ट्रातील आणि खरेतर जगभरातील मराठी संस्था, मराठी संस्कृती आणि मराठी समाज यांचे आपण काही देणे लागतो; असा सर्जक विचारच राज्य सरकारला व साहित्य संमेलने घेणाऱ्यांना कधी स्पर्श करीत नाही. वाढत्या बोलीच्या लिलावात संमेलन जिंकल्यासारखे वागणाऱ्या अनेक आयोजकांचे तर ‘आतले हेतू’ भलतेच असतात. यापुढे, हे मोडून काढावे लागेल. तेथे उत्सवांच्या पलीकडे मराठी भाषा व समाजाच्या भविष्याची क्रियाशील चर्चा व्हावी लागेल. मोदी या कार्यक्रमात सांगत होते की, मराठीसाठी काम करणाऱ्या सगळ्या संस्था, संघटना, विद्यापीठे यांच्या पाठीशी आता केंद्र सरकार उभे राहील. हेही आपोआप होणार नाही. त्यासाठी, हातात नेमकी कार्यक्रम पत्रिका घेऊन संसाधनांसाठी सरकारशी सतत संवाद करावा लागेल. भांडावे लागेल. मराठी माणसाचा स्वभाव ‘भांडकुदळ’ असल्याचे इतिहासात नोंदले आहे. हे खरे असते तर ‘अभिजात’ प्रस्ताव इतकी वर्षे रखडला नसता. आता झाले ते झाले. तंत्रज्ञानाच्या अफाट व चौफेर प्रगतीमुळे भाषेच्या प्रांगणात काय घडू शकते, यांची अनेक उदाहरणे मोदींनी दिली. ते पाहता कृत्रिम प्रज्ञेसहित इतर तंत्रसाधने वापरून आपण मराठीचा परीघ जगभर कसा वाढवू शकू, यावर संमेलनात कृतिकार्यक्रम ठरायला हवा. संमेलनांचा भर ललित साहित्यावर असतो. ते योग्यही असेल. आता केवळ तेवढे न करता मराठी भाषा व संस्कृतीपुढच्या आव्हानांना तंत्रज्ञानाची मदत घेऊन कसे भिडता येईल, यावर संमेलनाने लक्ष वळवायला हवे.

नवे मातृभाषाकेंद्री शैक्षणिक धोरण मराठीच्या विकासाच्या अनंत संधी घेऊन आले आहे; असे पंतप्रधान म्हणत असतील तर त्या प्रत्येक संभाव्य संधीचा आराखडा संमेलनात तयार का होऊ नये? मराठीचा असा विस्तार झाला तरच उद्या नवे वाचक घडतील. ते मग साहित्याकडे वळतील आणि संमेलनेही अक्षुण्ण चालू राहतील. ‘अभिजात’ हा नुसता शिक्का पडलाय. पुढे काय? या जातीचे नैराश्यवादी महाराष्ट्रात अनेक शतके आहेत. ते असणारच आहेत. खरा प्रश्न हा निर्णय आपण मराठी समाज म्हणून किती सघन व सफळ बनवतो, हा आहे. ही जबाबदारी साहित्य संस्थांनी घ्यावी. त्यांना सगळे कळते असे नाही. त्यांनी तज्ज्ञांशी, तंत्रज्ञांशी, तत्त्वचिंतकांशी बोलावे. काळ झपाट्याने बदलतो आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाला रोज ‘नवी क्षितिजे’ दिसत आहेत. हे सर्जक वारे शिडात भरून घेतले नाहीत तर संमेलनांचे नुसतेच उत्सव राहतील आणि अभिजात हा दरवर्षीचा सरकारी दिन होईल. तसे होता कामा नये.

# आपल्या पत्रातील भावना मनाभावाच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे साधन ‘टपाल’

९ ऑक्टोबर हा पहिला जागतिक पोस्ट दिवस १९६९ मध्ये टोकियो, जपान येथे यूनिवर्सल पोस्टल यूनियन काँग्रेसमध्ये घोषित करण्यात आला. भारतीय शिष्टमंडळाचे सदस्य श्री आनंदमोहन नरुला यांनी हा प्रस्ताव सादर केला होता. तेव्हापासून टपाल सेवांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी जगभरात जागतिक पोस्ट दिवस साजरा केला जातो. ‘इंडिया पोस्ट’ या ब्रँड नावाखाली व्यवहार करणारे टपाल विभाग ही भारतातली सरकारद्वारे संचालित अशी टपाल प्रणाली आहे, जी दळणवळण मंत्रालयाची एक उपकंपनी आहे. १ ऑक्टोबर १८५४ रोजी ब्रिटिश भारतात लॉर्ड डलहौजी ह्यांनी आधुनिक भारतीय टपाल सेवेचा पाया रचला. डलहौजी ह्यांनी एकसमान टपाल दर (सार्वत्रिक सेवा) लागू केलेत आणि ‘इंडिया पोस्ट ऑफिस अॅक्ट १८५४’ मंजूर करीत लॉर्ड विल्यम बेंटिक ह्यांच्या भारतात टपाल विभागाची स्थापना करण्याविषयीच्या १८३७ च्या कायद्यात दुरूस्ती केली.

दरवर्षी ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन किंवा ’वल्ड पोस्ट डे’ हा दिवस जगभरातून साजरा केला जातो. इंटरनेटच्या काळात आजही लोकं टपालसेवेचा वापर करतात आणि त्यावरचा लोकांचा विश्वास कायम आहे. एका शहरातून दुसरीकडे टपाल पाठविण्याचं सर्वात सोपं आणि स्वस्त साधन आहे ते म्हणजे पोस्ट सेवा. फक्त देशातच नाही तर जगातील कोणत्याही देशात टपाल पाठविण्यासाठी या सेवेचा लाभ घेता येतो. टपाल दिवस साजरा करण्याचा हेतू एवढाच कि, टपाल सेवा आणि त्यातील विभागांविषयी लोकांना जागरुक करणे होय. स्मार्टफोनच्या जमान्यात पत्र कोण पाठवेल? हा प्रश्न नक्कीच तुमच्या मनात देखील आला असेल. मात्र आजही भारतातील काही ठिकाणी पत्र हेच एकमेकांशी संपर्क करण्याचं साधन आहे. ’टपाल’ हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा, काळ बदलला तरी आजही त्याचे महत्व कायम आहे. एक काळ असा होता, जेव्हा लोक दिवस-रात्र पत्रांची वाट पाहत असे. मात्र बदलत्या काळाबरोबरच आणि तंत्रज्ञानाबरोबर मोबाईल, सोशल मीडियामुळे क्षणात कोणाशीही संवाद साधता येतो. मात्र आजच्या युवा पिढीला पत्र, पोस्टकार्ड आणि ग्रिटिंगचे महत्त्व हवे तेवढे वाटत नाही. एकेकाळी लोकांसाठी पत्र म्हणजेच सर्वकाही होतं.

युनिवर्सल पोस्टल युनियन (युपीयु) ची उभारणी करण्यासाठी ९ ऑक्टोबर १८७४ मध्ये स्विर्झलंडची राजधानी ’बर्न’ येथे २२ देशांनी मिळून करारावर सही केली होती. या घटनेच्या स्मृतीत टोकियोत




१९६९ मध्ये आयोजित केल्या गेलेल्या संमेलनात ९ ऑक्टोबरला जागतिक टपाल दिन म्हणून घोषित करण्यात आले. १ जुलै १८७६ ला भारत ’युनिवर्सल पोस्टल युनियन’ चा सदस्य होणारा पहिला आशियाई देश ठरला. बदलत्या काळासोबत जगातील सर्व टपाल सेवांनी त्यांच्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यक बदल केले आहेत. नवीन तंत्रज्ञानासह टपाल सेवांनी स्वतः ला अधिक जलद केले आहे. डाक, पार्सल, पत्र हे एक्सप्रेसने जाण्याची सेवा सुरु झाली. जवळपास २५ वर्षांपूर्वी या बदलावांना सुरुवात झाली आणि सर्वच स्तरावर तांत्रिक बदल करण्यात आले. आता ऑनलाईन पोस्टल देवाण-घेवाणीवरही लोकांचा विश्वास वाढला आहे. ’युपीयु ने केलेल्या एका सर्वेमध्ये अशी माहिती समोर आली की जगभरातून आजच्या घडीला ६५ पेक्षा जास्त प्रकारच्या ई-पोस्टल सेवा उपलब्ध आहेत. सध्याच्या टपाल व्यवस्थेची सुरवात सतराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली. १६८८ मध्ये मुंबई आणि मद्रास इथे कंपनी पोस्टची कार्यालये स्थापन झाली. मात्र त्याद्वारे केवळ कंपनीच्या टपालाचीच ने-आण होई. वॉरन हेस्टिंग्ज हा बंगाल प्रांताचा गव्हर्नर असताना त्याच्याकडे मुंबई आणि मद्रास इलाख्याच्या देखरेखीचे अधिकार होते. त्या काळात १७७४ मध्ये टपालसेवा जनतेसाठी खुली करण्यात आली. पोस्टमास्टर जनरलची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आणि टपालसेवेसाठी पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने टपालासोबत वापरायला सुरूवात झाली. सुरवातीच्या काळातील अडचणींवर मात करण्यासाठी सर्व प्रेसिडेन्सीं अंतर्गतची टपाल सेवा एकसूत्री असावी असा विचार पुढे आला. त्यातूनच पहिला भारतीय टपाल कायदा, १८३७ हा अस्तित्वात आला. त्यात पुढे बदल करून १८५४ चा टपाल कायदा अस्तित्वात आला. त्याद्वारे देशात टपाल सेवेचा एकाधिकार हा टपाल खात्याला देण्यात आला. २०११ पर्यंत त्यात बदल झालेला नाही. पैसे भरल्याचा पुरावा म्हणून धातूची टोकने मागे पडून, १ ऑक्टोबर १८५४ पासून चिकट पार्श्वभाग असलेली टपाल तिकिटे वापरात आली.



**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

१९७७ मध्ये भारतानं जाल कूपर यांचं टपाल तिकीट प्रसिद्ध केलं होतं. याचं कारणंही तसंच होतं. जाल कूपर हे टपाल तिकीट या विषयातील जागतिक पातळीवरचे अभ्यासक होते. मुंबईत पारशी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. इंडियाझ स्टॅम्प जर्नलचे संपादन केले होते. भारतातील पहिल्या तिकीट संपादक ब्यूरोचे ते संपादक होते. त्यांनी इम्पायर ऑफ इंडिया फिलाटेलिक सोसायटीची स्थापना केली होती. याच विषयावर त्यांनी पुढे पुस्तकही लिहिलं. त्यांच्या छंदाला त्यांनी शास्त्रीय स्वरुप दिलं. भारतीय टपाल तिकीटांचा अभ्यास जागतिक पातळीवर नेण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. टपाल तिकीट संग्राहक अशी कारकिर्दीची सुरुवात करुन जागतिक पातळी गाठणाऱ्या कूपर यांचे योगदान प्रचंड महत्वाचं आहे, हे त्यांच्यावर काढलेल्या तिकीटांवरुन लक्षात येतं. भारतात २३ टपाल क्षेत्रात विभागले गेले आहेत, प्रत्येक क्षेत्र चीफ पोस्टमास्टर जनरल यांच्या अध्यक्षतेखाली आहे. संपूर्ण देशासाठी ‘डायरेक्टर जनरल ऑफ पोस्ट’ हे प्रमुख पद आहे. युनिव्हर्सल पोस्टल युनियनने कार्यक्षम अशा टपाल सेवेचा मार्ग खुला केला, जी पुढे १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची एक प्रमुख संस्था बनली. भारत स्वतंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत टपाल तिकीटांच्या स्वरुपात, आकारात, रचनेत विविध बदल झालेत. त्यांच्यातील या बदलांमुळे त्या-त्या काळाविषयी माहिती मिळते. टपाल खाते नेते, फुलं, प्राणी-पक्षी, एखादी घटना, रौप्य, सुवर्ण, अमृतमहोत्सवी, शतक, द्विशतक किंवा त्रिशतकनिमित्त तिकीटं काढतं. १९४७ ला जेव्हा भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी पोस्ट तिकीटात बदल करण्यात आला होता. त्या तिकीटावर तिरंग्याचे चित्र दिले होते, तर कधी इंदिरा गांधी, महात्मा गांधी, राजीव गांधी, सचिन तेंडुलकर यांच्या सारख्या थोर व्यक्तींच्या प्रतिमा टपाल तिकीटांवर विशेष काळात होत्या. यावरुन आपल्याला त्या काळात त्यावेळी घडलेल्या घटनांची माहिती मिळते. त्यामुळेच टपाल तिकीटे हा इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे. हिमाचल प्रदेशमधील हिक्किम नावाच्या गावामध्ये जगातील सर्वात उंचावरील टपाल कार्यालय अर्थात पोस्ट ऑफिस आहे. ४४४० मीटर उंची जेथे श्वास घेण्यास अडचण येते, अशा ठिकाणी १९८३ पासून हे टपाल कार्यालय दुर्गम भागात पत्र पाठवण्याचे काम करते. हिक्किमच्या आजुबाजूच्या गावांचे संचाराचे एकमात्र साधन हे पत्र आहे. या टपाल कार्यालय हिक्किमबरोबरच लांगचा-१, लांगचा-२ आणि कॉमिक गावांमध्ये पत्र पोहचवण्याचे काम करते. बर्फामुळे जून ते ऑक्टोबरच्या काळात या ठिकाणी जाणे शक्य नसते. या टपाल कार्यालयात १९८३ पासून रिनचेन नावाची व्यक्ती पोस्टमनचे काम करत आहे. अनेकदा बर्फामुळे त्यांना घरी परतण्यास अडचणीचा सामना देखील करावा लागतो. तत्परतेने सेवा देणाऱ्या भारतीय टपाल विभागातील सर्वांना ‘आंतरराष्ट्रीय टपाल दिना’ निमित्त मनपूर्वक शुभेच्छा!

# महागाई नियंत्रित करण्यासाठी

आपण ग्राहक मूल्य निर्देशांकातील वस्तू व सेवा यांचा भार पाहिला, तर खाद्यान्नाचा भार सुमारे ४६ टक्के असल्याचे उघड होते. ही बाब देशातील दारिद्र्य दर्शविणारी आहे. ग्राहक मूल्य निर्देशांकातील वाढ नियंत्रित करण्यासाठी आपल्याला खाद्यान्नाच्या किमतीत होणारी वाढ कमी करायला हवी. असे प्रयत्न आपल्याला सातत्याने व नेटाने सुरू ठेवावे लागतील.

खाद्यान्नाच्या किमती नियंत्रित करणे हे काम आपल्या देशात खूपच अवघड ठरणारे आहे. कारण कृषी उत्पादनांच्या किमती सरकारने वाढवाव्यात यासाठी देशातील सर्व शेतकरी सातत्याने आंदोलन करीत आहेत. तसेच डॉक्टर एम. एस. स्वामिनाथन आयोगाने कृषी उत्पादनांचे किमान आधारभाव एकूण उत्पादन खर्चाच्या दीडपट करावेत, अशी शिफारस सन २००६मध्ये आपल्या अहवालात केली होती. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारने तेव्हा तात्काळ प्रथम गहू आणि नंतर तांदूळ यांच्या किमान आधारभावात अनुक्रमे ३३ व २२ टक्क्यांची वाढ केली. सरकारच्या या कृतीमुळे तेव्हा महागाईचा भडका उडाला होता.

आता देशातील जवळपास सर्व राजकीय पक्ष कृषी उत्पादनांचे किमान आधारभाव सदर आयोगाच्या शिफारशीनुसार एकूण उत्पादन खर्चाच्या दीडपट करावेत यासाठी आंदोलन करीत आहेत. महागाई वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेले हे आंदोलन आहे. जगातील कोणत्याही देशात महागाई वाढविण्यासाठी कोणी आंदोलन केलेले नाही आणि कोणी करणारही नाही. असे आंदोलन ही भारतीय राजकारणाची खासियत होय!

याच्याही पुढे जाऊन आता देशातील शेतकऱ्यांच्या संघटना किमान आधारभाव सांविधिक करावेत यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. सरकारने शेतकऱ्यांची ही मागणी मान्य केल्यास किमान आधारभावापेक्षा कमी किमतीला कृषी उत्पादनांची खरेदी वा विक्री करणे हा भारतीय दंड संहितेनुसार दखलपात्र गुन्हा ठरेल. परिणामी असा व्यवहार करणारे व्यापारी गजाआड बंद होतील. शेतकऱ्यांच्या या (अविवेकी) मागणीला राहुल गांधी यांनी विनाशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. अशा रीतीने देशातील जवळपास सर्व राजकीय पक्ष आणि राहुल गांधी यांच्यासारखे बेजबाबदार राजकीय नेते महागाई वाढावी, आर्थिक आघाडीवर पूर्वी कधीही झाला नव्हता एवढा गोंधळ सुरू व्हावा, या प्रयत्नात आहेत.

वास्तविक देशातील गोरगरिबांना जगणे सुसह्य होण्यासाठी कृषी उत्पादनांचे भाव खालच्या पातळीवर स्थिरावण्यासाठी प्रयत्न करायला



हवेत. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढविल्यास कृषी उत्पादनांचे भाव कमी केल्याचा भार शेतकऱ्यांच्या शिरावर पडणार नाही. अशी उत्पादकता वाढविण्यासाठी अनेक उपाय योजावे लागतील. त्यातील सर्वांत महत्त्वाचा उपाय शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे हा होय. तसेच शेतकऱ्यांना संकरित बियाणे उपलब्ध करून देणे, नॅनो रासायनिक खते पुरविणे, कृषी संशोधन व कृषी विस्तार या कार्यक्रमांसाठी सढळ हाताने खर्च करणे असे उपाय करायला हवेत. भारतात भाज्या व फळे यांचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे भाववाढीची प्रक्रिया वेगवान झाली आहे. सदर कृषी उत्पादनांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी. भारताला पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर समुद्राच्या रूपाने एक नैसर्गिक वरदान मिळाले आहे. त्याचा लाभ उठवायला हवा. यासाठी समुद्रातील मासे पकडून लोकांना प्रथिनांचा पुरवठा करण्याचे काम सहज करता येईल. भारतात दूध देणारी सुमारे ३० कोटी गुरे आहेत. परंतु अशी गुरे त्यांच्या अंगभूत क्षमतेच्या केवळ पन्नास टक्के एवढेच दूध देतात. अशा गुरांना पुरेसा ओला व सुका चारा मिळत नाही, हे त्यामागील प्रमुख कारण. तसेच दुभत्या गुरांना पुरेशा प्रमाणात प्रथिनांचा पुरवठा होत नाही.

हरित क्रांती होण्यापूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी वा बाजरी अशी पिके घेतली जात. अशा पिकांचा कडबा हा चांगले पशुखाद्य होता. परंतु आता ज्वारी वा बाजरी या पिकांखालचे क्षेत्र कमी झाले आहे. त्याच्याऐवजी शेतकरी भात आणि गहू ही पिके घेतात. या पिकांचे अवशेष म्हणजे अनुक्रमे पेंढा व काड गुरांसाठी वैरण म्हणून वापरता येत नाही. तसेच देशात पुरेशा प्रमाणात तेलबियांचे उत्पादन होत नसल्यामुळे गुरांना पेंड पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. यामुळे आज दुभती गुरे कुपोषित आहेत. त्यामुळे ती त्यांच्या अंगभूत क्षमतेपेक्षा कमी दूध देतात. दुभत्या गुरांना पुरेसा चारा मिळण्यासाठी देशात उपजाऊ पडीक असणाऱ्या दोन कोटी हेक्टर जमिनीपैकी सुमारे १५ टक्के जमिनीवर चाऱ्याची लागवड करायला हवी. तसेच दुभत्या गुरांना पुरेशा प्रमाणात प्रथिने मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतांच्या बांधावर आणि मोकळ्या जागेवर शेवगा व तुती अशा वृक्षांची लागवड करायला हवी. शेवगा व तुती यांच्या पाल्यामध्ये पाल्याच्या एकूण वजनाच्या २५ टक्के प्रथिने असतात. क्युबा या देशात अशा वनस्पतींचा दिवसाला पाच किलो चारा दुभत्या गुरांना देऊन प्रथिनांची गरज भागविली जाते. आपण क्युबाचा कित्ता गिरवायला हवा.दुभत्या गुरांच्या चाऱ्यापाण्याची व्यवस्था केल्यावर दुधाच्या उत्पादनात भरघोस वाढ होईल. दुधाचे दर खालच्या पातळीवर स्थिरावतील. भारतात दूध उत्पादनाचा व्यवसाय प्रामुख्याने सीमांत शेतकरी व अल्पभूधारक शेतकरी करतात. अशा गरीब शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. तसेच देशातील गोरगरीब ग्राहकांना वाजवी भावात दूध मिळणे गरजेचे आहे. अशा रीतीने देशात धान्यांच्या, दुधाच्या आणि मासे यांच्या पुरवठ्यात वाढ झाली तर ती कमी किमतीत उपलब्ध होतील. अशा उत्पादनांच्या किमती कमी झाल्यावर देशातील कुपोषणाची समस्या हळूहळू निकालात निघेल. देशातील कार्यक्षम लोकांच्या संख्येत लक्षणीय प्रमाणात वाढ होईल.भारतात भाज्या व फळे यांचे उत्पादन पुरेशा प्रमाणात होत नसल्यामुळे अशा उत्पादनांचे भाव वरच्या पातळीवर स्थिरावले आहेत. भाज्या व फळे यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी. सिंचनासाठी असे पाणी उपलब्ध होण्यासाठी उसाखालचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर कमी करावे लागेल. या आव्हानाचे स्वरूप निखळ राजकीय असल्यामुळे उसाखालचे क्षेत्र कमी करणे ही बाब अवघड ठरणार आहे. त्यामुळे भाज्या व फळे यांच्या उत्पादनासाठी पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमाला चालना देणे गरजेचे ठरेल. तसेच शेततळ्यांची संख्या वाढवून भाज्या व फळे यांच्या उत्पादनासाठी थोडेफार अधिक पाणी उपलब्ध करून देता येईल. अशा रीतीने धान्यांच्या, दुधाच्या आणि भाज्या व फळे यांच्या उत्पादनात भरघोस वाढ झाल्यावर अशा उत्पादनांचे दर खालच्या पातळीवर स्थिरावू लागतील. या प्रक्रियेची व्याप्ती वाढल्यावर महागाईचा राक्षस बाटलीत बंद होईल. सरकारने अशा सुखद बदलासाठी क्रियाशील होण्याची गरज अधोरेखित होते. हा मार्ग पारंपरिक रस्त्यापेक्षा वेगळा आहे. परंतु विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी या मार्गावरून वाटचाल करावी लागणार आहे.

# सरकारचा दिखाऊपणा उघड ; पीक विमा कंपनीस हप्ता देय केलाच नाही; किसान सभेच्या आंदोलनामुळे प्रकरण उजेडात

## जिल्ह्यातील लाखो शेतकरी खरीप पीक विम्यापासून वंचीत

**परळी । प्रतिनिधी**

खरीप २०२४ हंगामातील नुकसान भरपाई, सण २०२३ मधील प्रलंबित विमा दावे निकाली काढत लवकरात लवकर शेतकऱ्यांना पीक विमा मिळावा याकरिता अखिल भारतीय किसान सभेकडून सोमवार दि १७ पासून विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.खरीप २४ मधील पीक विमा बाबत शासन हिस्सा विमा कंपनीला न दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची ४ महिन्या पासून प्रतीक्षा करावी लागत आहे.खरीप सन २०२३ या हंगामातील नुकसान भरपाई १० दिवसात देऊन अन्य मागण्या पूर्ण करण्यात येतील असे लेखी आश्वासन विमा कंपनी कडून आंदोलनकर्त्यांना देण्यात आले. दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास किसान सभा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करत विमा घेतल्याशिवाय हटणार नसल्याची ठाम भूमिका घेत हे बेमुदत धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

खरीप २०२४ हंगामातील नुकसान भरपाई निश्चित करून लवकरात लवकर नुकसान भरपाईचे वाटप करण्यात यावे, खरीप २३-२४ मधील प्रलंबित मंजूर विमा दावे वर्ग करण्यात यावे, प्रलंबित दावे काही करणास्थाव वर्ग होणे बाकी राहिले तर संबंधित शेतकरी याद्या सबंधित तालुका कृषि कार्यालय यांना देण्यात यावे तसेच तालुका विमा प्रतिनिधि मार्फत शेतकरी यांच्या कडे प्रसारित करण्यात यावेत यासह इतर मागण्या घेत किसान सभेकडून सोमवार दि १७ रोजी पीक विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले होते.खरीप २४ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिह्यातील शेतकऱ्यांना नुकसाई भरपाई बाबत विमा कंपनी कडून अद्याप शासनाकडून शासन हिस्सा रक्कम विमा कंपनीला देण्यात आला नसल्याचे विमा देण्यात अडथळा येत असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले.या आंदोलनाची तीव्रता पाहता विमा कंपनी प्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेत काही मागण्या येत्या दहा दिवसात योग्य ती कार्यवाही करून बाधित शेतकऱ्यांना भरपाई देण्याचे




लेखी आश्वासन दिले. या आंदोलनामध्ये किसान सभेचे कॉं मुरलीधर नागरगोजे, कॉ.दत्ता डाके कॉ.भगवान बडे, कॉ.बालाजी कडबाने, कॉ.सुभाष डाके, दादासाहेब शिरसाट कॉ.गंगाधर पोटभरे यांच्यासह जिह्यातील शेकडो शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाले होते.आपल्या न्याय हक्कासाठी वारंवार चकरा मारून ही प्रश्न निकाली निघत नसल्याने किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी विमा कंपनी समोर सुरू केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनास आ.सुरेश धस यांनी भेट देत आंदोलनकर्ते आणि विमा कंपनी प्रतिनिधी यांच्यात चर्चा करण्यात आली. यावेळी खरीप २४ मधील नुकसान भरपाई देण्याबाबत शासन हिस्सा कंपनीला प्राप्त झाले नसल्याचे समजले असता याबाबत मुंबईला जाऊन कृषिमंत्री आणि वित्त मंत्री यांची भेट घेऊन लवकरात लवकर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप २४ चा विमा मिळण्यासाठी प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सोयाबिन, तूर, कापूस खरेदी तसेच अन्य प्रश्नावर सभागृहात आवाज उठवू असे आश्वासन दिले.पीक विमा कंपनीच्या वतीने सन २०२३ मधील खरीप व रब्बी हंगामातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे वाटप, सन २०२४ मधील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना सरसकट पीक विम्याचे वाटप, रब्बी २४-२५ मधील पीक विम्याचे वाटप इत्यादी प्रलंबित विमा प्रश्नावर काही दिवसामध्ये शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे. विमा कंपनी कडून जर या आश्वासनाची पूर्तता नाही झाल्यास किसान सभा जिह्यातील शेकडो बाधित शेतकऱ्यांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यलयासमोर भरपाई पदरात पडत नाही तो पर्यंत मुक्कामी आंदोलन करण्यात येईल तसेच सोयाबीन कापूस तूर जर हमीभावाने खरेदी नाही झालं तर भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मदत करा अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

# सेवालाल महाराज जयंतीचा निधी अनाथांच्या मदतीला

**वडवणी (प्रतिनिधी):** संत सेवालाल महाराज यांची जयंती दरवर्षीप्रमाणे थाटामाटात साजरी करण्याऐवजी ती साध्या पद्धतीने साजरी करून त्यामधून निधी जमा करून वारोळा तांडावरील अनिल आणि आरतीच्या त्या चिमुकल्या अनाथ लेकरांना मदत म्हणून देण्यात आला. वडवणी येथील सालखोडी तांडा येथील नागरिकांनी सामाजिक दायित्व म्हणून या चिमुकल्या लेकरांना ही मदत केली त्यांचे कौतुक होत आहे. वारोळा तांड्यावरील ऊसतोड मजूर अनिल आणि आरतीताई यांचे अपघाती निधन झाले. होते. त्यामुळे त्यांचे तीन मुलं अनाथ झालेली आहेत. एक हात मदतीचा हा उपक्रम बंजारा समाजाचे राज्यस्तरीय नेते बी. एम. पवार यांनी राबवला आणि या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद राज्यातील बंजारा व इतर समाजाकडून मिळत आहे. राज्यभरात संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी करत असताना आपल्या समाजातील एका ऊसतोड कामगाराच कुटुंब



उघड्यावर पडले आहे. त्यांचे लेकरं अनाथ झाले आहेत याचं भान ठेवत समाजातील विविध स्तरातून आता मदतीचा ओघ सुरू आहे. बी. एम. पवार यांनी आवाहन केल्यानंतर विविध ठिकाणाहून मदत येत आहे. जयंती उत्सव मधून खर्चाला फाटा देत उरलेली रक्कम मयत ऊसतोड कामगार अनिल व अनिता या दांपत्याच्या लेकरांना वाघोरा तांड्यावर पाठविली जात आहे. वडवणी येथील सालखोडी तांडा येथील नागरिकांनी संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी केली या जयंती मध्ये खर्चामध्ये बचत करीत काही रक्कम नागरिकांनी जमा केली. ती रक्कम आता या लेकरांना पाठविण्यात आली आहे. सालखोडी तांडा येथील नागरिकांचे दायित्व पाहून त्यांचं सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शिवसेना नेते विनायक बप्पा मुळे, बी. एम. राठोड, बबन आडे, विलास चव्हाण, अशोक राठोड, प्रकाश राठोड, दिलीप जाधव, रवि राठोड, बजरंग आडे, सुधाकर पवार, अजय चव्हाण, अजय राठोड, पवन राठोड, प्रविण राठोड, शरद चव्हाण, परमेश्वर राठोड, इत्यादींनी परिश्रम घेतले.

# मा.खा.प्रितमताई यांच्या वाढदिवसा निमित्त शालेय साहित्याचे वाटप

**पाटोदा (प्रतिनिधी):** बीड जिल्ह्याच्या भाजपच्या नेत्या माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज केंद्रीय प्राथमिक शाळा जिल्हा परिषद पाटोदा येथे भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. सुधीर घुमरे यांच्या आयोजनाखाली शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून दिव्य मराठीचे पाटोदा तालुक्यातील नामांकित पत्रकार ॲड.महेश बेदरे, थेरला येथील सामाजिक कार्यकर्ते चंदू दुधाळ, जवळाला येथील माजी उपसरपंच प्रवीण देवडे, तसेच मुख्याध्यापिका राऊत मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रसिद्ध साहित्यिक निवेदनकार सुरेखाताई खेडकर यांच्या सह जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक वर्ग यांची उपस्थिती होती. त्यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. सुधीर घुमरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना खा. डॉक्टर



प्रीतम ताई मुंडे यांनी गेली दहा वर्ष जिल्ह्याचे खासदार म्हणून काम करत असताना बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा प्रश्न नगर परळी रेल्वे मार्गाची काम त्यांच्या कारकिर्दीमध्ये भरघोस असा निधी केंद्र सरकारकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी रेल्वे प्रशासन यांच्याकडून खेचून आणत हे बीड जिल्हा वाशियांची स्वप्नपूर्ती कडे वाटचाल होताना आज नगर वरून बीड पर्यंत रेल्वे धावली आहे यात प्रीतम ताई यांचा सिंहाचा वाटा आहे तसेच बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधव रेल्वे कृती समिती यांच्या देखील लढ्याचे यश आहे असे अँड सुधीर घुमरे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच आपण दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील कुठलाही खंड न पडु देता सातत्य ठेवत प्रीतम ताई च्या वाढदिवसानिमित्त सामाजिक शालेय साहित्य वाटपासारखे उपक्रम यापुढेही राबवणार असल्याचा संकल्प केला, यावेळी पत्रकार महेश बेदरे यांनी देखील यावेळी प्रियतताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, शालेय विद्यार्थिनी प्रीतम ताई यांना भरभरून व्हिडिओ कॉल करून बर्थडे साँग म्हणत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा प्रशासनाने मारले पण प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना तारले पवनचक्की कंपनीने नुकसान भरपाई सहित शेतकऱ्यांना मावेजा दिला-डॉ.ढवळे

**लिंबागणेश (प्रतिनिधी):** बीड तालुक्यातील बालाघाटावरील मुळुकवाडी गावातील शेतकऱ्यांने शेतकऱ्यांच्या सहमती विना कोणताही मोबदला न देताच शेत जमिनीतुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने आमच्या शेत जमिनीतुन माझ्या कुटुंबाच्या सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी पोकलेन, जेसीबी,जीप, पीक अप अशा विविध वाहनांची नियमबाह्य वाहतूक करत शेजजमीनीचे नुकसान करत असल्याची लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना दिली होती. मात्र जिल्हा प्रशासनाकडुन नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आले. याविषयी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर पवनचक्की कंपनी ताळ्यावर आली आणि ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाने मारले परंतु प्रसारमाध्यमांनी तारले अशी भावना





शेतकऱ्यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवत प्रसारमाध्यमांचे आभार मानले.मुळुकवाडी येथील गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमिनी मधुन रिन्यु ग्रीन एम. एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने विनासहमती शेतातुन पवनचक्की उभारणीसाठी वाहनातुन साहित्य नेल्याने जमिनीचे नुकसान होत असुन प्रतिबंध घालण्यात यावा अशी तक्रार जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली होती. मात्र जिल्हा प्रशासनाने याची दखल घेतली नव्हती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रसारमाध्यमांना याबाबत कल्पना दिल्यानंतर विविध दैनिकात याबाबत बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.अखेर पवनचक्की कंपनीचे अधिकारी यांनी पवनचक्कीशी संबंधित गट क्रमांक.६४३,६४५, ६४८,६४९,६५०,६५१ मधील सर्वच शेतकऱ्यांना ज्यांच्या शेतजमिनीतुन वाहनांची वाहतुक होते त्यांना प्रति गुंठा १५ हजार रुपये मावेजा व ज्या शेतकऱ्यांचे ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई दिली आहे.त्यामुळे एकंदरीतच प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला आहे. जिल्हा प्रशासनाची जबाबदारी प्रसारमाध्यमांनी पार पाडली असे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले आहे.

# वारकरी संप्रदायातील मधुकर खाडे हे निष्काम कर्मयोगी होते-ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे

## होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

**केज (प्रतिनिधी):** जो कोणत्याही फळाची किंवा परिणामांची अपेक्षा न करता, निःस्वार्थ, इच्छाशून्यपणे कर्तव्य करतो, त्याला निष्काम कर्मयोगी म्हणतात. वारकरी संप्रदायातील मधुकर महाराज खाडे हे निष्काम कर्मयोगीच होते, असे प्रतिपादन होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे कोद्रीकर यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. गंगापुजनानिमित्त केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव असलेले ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे रविवारी (दि.१६) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. अर्जुन महाराज लटपटे यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ।।१।। धन्य आम्ही जन्मा आलो । दास विठोबाचे झालो ।।ध्रु. आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे ।।२।। तुका म्हणे पावठणे । करू स्वर्गाची निशाणी ।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. महाराज म्हणाले, होळ पंचक्रोशीतील दिवंगत व्यक्तींमध्ये आवर्जून नाव घ्यावे, अशा मंडळींमध्ये मधुकर महाराज खाडे यांचा नामोल्लेख होईल. त्यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारण या क्षेत्रात पूर्ण ताकदीने झोकून दिले. जन्माला आलेला देह आपल्यातून निघून जातो. चांगुलपणाचे मूर्तिमंत व्यक्तीमत्व असलेले मधुकर महाराज खाडे यांचे निधन झाले. ते निष्काम सेवा करणारे होते. भगवंताचे चिंतन करणारे मानवी शरीर स्वर्गात स्थान प्राप्त करते. त्यासाठी जात, कुळ, धर्म याची अट ईश्वराने घातलेली नाही. मधुकर महाराज खाडे हे सेवा करून मोकळे होत असायचे, त्यांनी कधीही मालक होण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या निष्काम सेवेचे स्मरण रहावे, यासाठी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत समाधी व्हावी अशी अपेक्षा अर्जुन महाराज लटपटे यांनी व्यक्त केली. अलीकडे प्रत्येकाच्या मनात मालक होण्याची भावना असते. सेवा करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे. दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. सेवेतून मानवी शरीर देखील देवरूप होऊ शकते, त्यासाठी तितका भक्तिभाव गरजेचा आहे, तो मधुकर महाराज खाडे यांच्या अंगी होता, असेही अर्जुन महाराज लटपटे म्हणाले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे मंगळवारी (दि.१८) किर्तन होणार आहे. या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप!

# जिद्द,सातत्य,सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते-गणेशराव वाघ

## शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्याचे पुढील भविष्य घडते-सौ.सुदामतीताई वाघ






**बीड । प्रतिनिधी**

जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर जीवनात हमखास यश मिळते. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य असा वेळ मोबाईलमध्ये वाया न घालवता वाचनाकडे लक्ष देऊन आपलं ध्येय गाठावे, गरज पडेल तेंव्हा आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही प्रचंड अभ्यास करून जीवनात उज्ज्वल यश मिळवावे असा सल्ला शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आदर्श मुख्याध्यापक श्री गणेशराव वाघ सरांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ या होत्या. तर व्यासपीठावर गावातील ज्येष्ठ नागरिक श्री दिलीप नाना जोगदंड, सौ शालिनीताई जोगदंड, श्री मिथुन जोगदंड, नुकताच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात काल मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि.शैलेश जोगदंड याचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ ह्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार स्वागत गीतासह पुष्पगुच्छ शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर इयत्ता नववी वर्गातील कु. अमृता पाखरे आणि कु. आलिशा शेख यांनी दहावीच्या विद्यार्थ्याबाबत आपले मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. तर इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रणाली पदमुले हिने मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे श्री मिथुन जोगदंड यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड यांने सत्काराला उत्तर देताना आपल्या यशामध्ये आई-वडिलांसोबतच शाळेचा आणि शिक्षकवृदांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. आपण आयुष्यात आपल्या शिदोड गावाला आणि श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाला कधी ही विसरणार नाही. शाळेसाठी माझी गरज लागेल तेव्हा मदतीसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही या वेळी शैलेश जोगदंड यांने दिली. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री गणेशराव वाघ सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना संस्थाचालक श्री गणेशराव वाघ साहेब म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आई -वडील आणि शिक्षकांचा मोठा वाटा असतो. सध्याच्या वातावरणात परिस्थितीमध्ये अनेक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन झाले आहेत. आपण मात्र या व्यसनापासून दूर रहावे. कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. दररोज सकस व संतुलित आहार घ्यावा. आजचे अनेक विद्यार्थी मोबाईलच्या व्यसनाच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी अडकले आहेत. आपण वेळीच सावध झाले पाहिजे. मोबाईलचा गरजेपुरताच वापर करावा. या मोबाईल पेक्षा थोर साधू, संत, विचारवंत आणि महापुरुषांच्या पुस्तकांचे वाचन करावे. आपले करिअर घडवण्यासाठी लक्ष केंद्रित करावे. जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते हे तत्त्व कायम लक्षात ठेऊन अभ्यास करून आई वडिलांचे, आपल्या शाळेचे, आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांना जीवनात जेंव्हा आमची गरज पडेल, तेव्हा आम्ही आपल्यासाठी सदैव तत्पर राहून तुम्हाला मदत करू असा दिलासा दिला. शिवाय या वेळी त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे दाखले आणि गोष्टी सांगितल्या. शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्याचे पुढील भविष्य घडते. असे सांगत दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले. तर आभार दत्तात्रय चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी दहावीचे विद्यार्थी कु. प्रणाली पदमुले आणि चि. संतोष पदमुले या बहिण भावांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला शाळेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भेट दिला. सदरील पुतळा आणि दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेला खुर्चांची दिलेली भेट मान्यवरांच्या शुभ हस्ते स्वीकारण्यात आली. अल्पोहारा नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# थर्मल पावर स्टेशन परळीचे कार्यकारी अभियंता यांचे बँक खाते जप्त-अंबाजोगाई न्यायालयाचा आदेश



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

थर्मल पावर स्टेशन परळीच्या २५० मेगावॅट विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी वडगाव दादाहारी (ता. परळी) येथील जमिनी भूसंपादन फाईल क्र. १६/२००७ अन्वये संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना या संपादित जमिनींचा मावेजा अत्यल्प दिल्याने त्यांनी बाजारभावानुसार योग्य भरपाई मिळावी म्हणून मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायाधीश, अंबाजोगाई येथे भूसंपादन प्रकरणे (क्र. २६, २७, २८, ३०, ४४, ४५, ४६, ४७, ४८ व ५०/२०१०) दाखल केली.

डिसेंबर २०२२ मध्ये न्यायालयाने संबंधित शेतकऱ्यांच्या अर्जाचा अंशतः स्वीकार करत त्यांना वाढीव मावेजा मंजूर केला. मात्र, थर्मल पावर स्टेशनने हा वाढीव मावेजा शेतकऱ्यांना दिला नाही किंवा न्यायालयात जमा केला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयात वसुली अर्ज (क्र. २८ ते ३२/२०२३) दाखल केले. सुनावणीदरम्यान, कार्यकारी अभियंत्यांना अनेक संधी दिल्यानंतरही त्यांनी शेतकऱ्यांची येणे रक्कम जमा केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी न्यायालयाला कार्यकारी अभियंता, थर्मल पावर स्टेशन परळी यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र, टी.पी.एस कॉलनी शाखा परळी येथील खाते जप्त करण्याची विनंती केली. या विनंतीवर दि. ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी न्यायालयाने थर्मल पावर स्टेशन परळीचे खाते जप्त करण्याचा आदेश दिला. तसेच, बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापकांना पुढील आदेशापर्यंत हे खाते जप्त ठेवण्याचे निर्देश दिले. याप्रकरणात, थर्मल पावर स्टेशनकडे निधी उपलब्ध असूनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मावेजा दिला गेला नाही, ही मुद्दाम केलेली टाळाटाळ असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळेच न्यायालयाने कठोर निर्णय घेत कार्यकारी अभियंता यांचे खाते जप्त केले. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बाजू ॲड. विष्णूपंत सोळंके यांनी प्रभावीपणे मांडली. त्यांना ॲड. रणजित सोळंके, ॲड. रामभाऊ जाधव, ॲड. शिवराज साळुंके यांचे सहकार्य मिळाले.

# ॲड.संतोष पवार यांना शेतकरी सहवेदना पुरस्कार जाहीर

## १९ मार्च ला होणार वितरण



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थेस अन्नत्याग आंदोलन समिती अंबाजोगाई च्या वतीने देण्यात येणारा या वर्षीचा राज्यस्तरीय शेतकरी सहवेदना पुरस्कार ॲड. संतोष पवार यांना जाहीर करण्यात आला आहे.

दि.१९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक सुदर्शन रापतवार यांनी दिली.

अन्नत्याग आंदोलन समिती अंबाजोगाई च्या वतीने आर्थिक विवंचनेतुन आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्यास अथवा संस्थेस आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या स्मृती निमित्ताने हा शेतकरी सहवेदना पुरस्कार प्रति वर्षी प्रदान करण्यात येणार आहे. या वर्षीचा पुरस्कार महाराष्ट्रात आधार माणुसकीचा या संस्थेचे माध्यमातून आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक उभारणी देण्यासाठी, त्यांच्या मुलांची शैक्षणिक जबाबदारी सांभाळून आर्थिक मदत मिळवून

# रयतच्या श्री.गणेश विद्या मंदिर शाळेच्या तीन विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य पोलिसपदी निवड



**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.गणेश विद्या मंदिर व कै. प्रशांत तुकाराम पोकळे महाविद्यालयाच्या भारत बबन पवार, सोमनाथ तुकाराम मिसाळ व कु.निकीता भिमराव भवर या तीन माजी विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य मुंबई पोलीसपदी निवड झाली आहे.हे तीनही विद्यार्थी अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.गणेश विद्या मंदिर शाळेचे इ.५ वी पासूनचे विद्यार्थी आहेत.शाळेत असल्यापासून सदर विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होत असत.विद्यालयातर्फे आयोजित सत्कार समारंभाप्रसंगी बोलताना भारत पवारने सांगितले की,शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे तसेच शाळेतील विविध सहशालेय उपक्रमांमुळे मी हे यश मिळवू शकलो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सोमनाथ मिसाळ याने सांगितले की, जिद्द,चिकाटी व नियमित अभ्यास या गोष्टींनी कोणत्याही क्षेत्रात आपण यश मिळवू शकतो.त्याचबरोबर शिक्षकांची आज्ञा पाळणे,शालेय शिस्तीचे पालन करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.शाळेच्या तीनही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके सर,जेष्ठ शिक्षक एफ.एस. जाधवर सर,डुचे सर,सदावर्ते सर, सानप सर,काळे सर,काकडे सर,केंद्रे सर,दहिफळे सर,श्रीमती मेढे मडम, श्रीमती आंधळे मडम,ग्रंथपाल सौ. सुळे मडम यांच्या हस्ते तीनही विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटी सदस्य ए.टी.पोकळे सर,मुरलीधर पवार तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांनी भारत पवार,सोमनाथ मिसाळ व कु.निकीता भवर यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चोंडी येथे त्रिदिवशीय किर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्याचे आयोजन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील चोंडी येथील सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान स्थापना वर्धापन दिनानिमित्त दि.१८ फेब्रुवारी ते दि.२० फेब्रुवारी दरम्यान किर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या किर्तन महोत्सवाचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे आवाहण सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थांनच्या वतीने करण्यात आले आहे.या भव्य त्रिदिवशीय किर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्यामध्ये दि.१८ फेब्रुवारी ते दि.१९ फेब्रुवारी रोजी रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तन होणार आहे. दि.१८ फेब्रुवारी मंगळवार रोजी ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर ,दि.१९ फेब्रुवारी बुधवार रोजी ह.भ.प.अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे. तर दि.२० फेब्रुवारी गुरूवार रोजी सकाळी १० ते १२ च्या दरम्यान सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान चोंडी चे मठाधिपती महंत ह.भ.प. आप्पासाहेब महाराज चौरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्याच प्रमाणे या महोत्सवादरम्यान भजन, किर्तन, महापुजा,यात्रा महोत्सव व इतरही धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची सांगता काल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाची आयोजन करण्यात आले आहे. या त्रिदिवशीय कीर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे आवाहन सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान चे मठाधिपती महंत ह.भ.प. आप्पासाहेब महाराज चौरे व सद्गुरू चंद्रशेखर बाबा मठ संस्थान चोंडी च्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड जिल्ह्यातील ९३६४ लाडक्या बहीणी अपात्र



**बीड (प्रतिनिधी):** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत आता महिलांच्या अर्जाची तपासणी सुरु झाली आहे. लाडकी बहीण योजनेतून साडेपाच लाख महिलांचे अर्ज बाद करण्यात आले आहे. दरम्यान मराठवाड्यातील ५५ हजार ३३४ लाडक्या बहिणींचे अर्ज बाद होणार आहेत. तर बीड जिल्ह्यात ६३६४ लाडक्या बहीणी अपात्र झाल्या आहेत.

आता नव्या नियमानुसार लाभार्थी महिलांना बँकेत दरवर्षी जून-जुलै महिन्यांत ई-केवायसी सादर करावे लागेल. तसेच हयातीचा दाखलादेखील महिलांना द्यावा लागेल. यानंतरच लाडकी बहीण योजनेचे पैसे बँक खात्यात येतील.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077